http://www.sgbauonline.com/



**B.A. (Part-II) Examination**

**(Modern Indian Languages)**

**COMPULSORY LANGUAGES**

**MARATHI**

वेळ—तीन तास] [एकूण गुण—70

1. भारतीय संस्कृतीत ज्ञानाला असलेले अपरंपार महत्व साने गुरुजींनी 'बुद्धिचा महिमा' या लेखामध्ये कसे विशद केले आहे ? 12

किंवा

संत गाडगेबाबांनी खरा मानवताधर्म आपल्या अखेरच्या कीर्तनातून कसा व्यक्त केला आहे ते पाठाच्या आधारे सांगा.

2. स्त्रियांचे वैधव्य व पुनर्विवाह यासंबंधी 'स्त्री-पुरुष तुलना' या लेखातील ताराबाई शिंदे यांचे विचार स्पष्ट करा. 8

किंवा

'डॉ. पंजाबराव देशमुख जनसामान्यांमध्ये एकरूप झालेले व्यक्तिमत्त्व आहे' पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

3. शेतकऱ्यांच्या मनातीळ पेरणीच्या हंगामातीळ अस्वस्थता, घालमेल व निसर्गाप्रती असलेल्या शेतकऱ्यांच्या मनातील भाव ना.धो. महानोरांनी आपल्या पाठातून कसा व्यक्त केला आहे ? 12

किंवा

'पंगू' या कथेच्या आशय उलगडून दाखवा.

4. नामदेव कांबळे यांच्या 'मातीचे धन' या कथेतील 'परसराम' चे व्यक्तिचित्र रेखाटा. 8

किंवा

शिवाजी महाराजांचा पर्यावरण विषयक दृष्टीकोन 'आज्ञापत्र' या पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

5. 'जमाखर्च स्वातंत्र्याचा' या मंगेश पाडगावकरांच्या कवितेचा आशय विशद करा. 12

किंवा

शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या पत्नीचे महत्व 'पाढराखी' या कवितेतून पा.श्रा. गोरे यांनी कसे पटवून दिले आहे ?

6. मोरोपंतानी सुसंगतीचा महिमा कसा वर्णन केला आहे ? 8

किंवा

कवी सिद्धार्थ भगत यांच्या 'जखमा अजून ओल्या' या कवितेतून कोणता आशावाद व्यक्त होतो ? स्पष्ट करा.



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

7. खालील 'अ' आणि 'ब' मधील पत्रे नमुने तयार करा :

(अ) रमेश जाधव, रामनगर अकोला या विद्यार्थ्यास 'मराठी शब्दकोश' बजाज बुक डेपो, नागपूर यांच्या कडून डाक द्वारा मागावयाचा आहे. त्यासाठी मागणीपत्र तयार करा. 5

किंवा

महाविद्यालय सोडल्याचा दाखला मिळण्यासाठी अभय गोरे या नावाने प्राचार्य, रामकृष्ण महाविद्यालय दारापूर यांना विनंती अर्ज करा.

(ब) अविनाश पाखरे, देऊळगावराजा या विद्यार्थ्याला संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचा उत्कृष्ट रा.से.यो. स्वयंसेवकाचा पुरस्कार मिळाल्या बद्दल त्याचे अभिनंदन करणारे पत्र प्रेमदास राठोड या नावाने लिहा. 5

किंवा

समर्थ महाविद्यालय, अचलपूर कॅम्प येथे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे मा. कुलगुरु यांनी विद्यापीठस्तरीय मल्लखांब स्पर्धेचे उद्घाटन केले व उपस्थित राहिले या बद्दल त्यांचे आभार मानणारे पत्र क्रीडा प्रतिनिधी या नात्याने सचिन गुडधे या नावाने लिहा.



http://www.sgbauonline.com/